दयानंद शिक्षण संस्था,लातूर

आ नो भद्रा: क्रतवो यन्तु विश्वत:

## दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

# मासिक ई-मॅगझीन

DEC 2025

महाविद्यालयात
आयोजित विविध शैक्षणिक, सांस्कृतिक,
क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर करणारे
मासिक ई-मॅगझीन.













No : 1234567890000000000

- - - - - - - - - - - - - -   - - - - - - - - - - - - - -   - - - - - - - - - - - - - -

# दयानंद शिक्षण संस्था परिसरात क्रीडाज्योत मशाल रॅलीचे भव्य स्वागत






स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ.मनोहर चासकर, प्र.कुलगुरु, डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे 27वा. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव 2025 दि. 4 ते 8 डिसेंबर 2025 दरम्यान संपन्न होत आहे. या महोत्सवाच्या जनजागृती करिता विद्यापीठातुन रॅली लातूर जिल्ह्यातील दयानंद शिक्षण संस्थेत आली असता या भव्य रॅलीचे दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, विज्ञान महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. गणेश लहाने, IQAC समन्वयक डॉ. संतोष पाटील यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारोती गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार सदस्य डॉ. केशव अलगुले, जिल्हा समन्वयक डॉ. बालाजी होकरणे यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन केले. ही रॅली दयानंद मुख्य प्रवेशद्वारापासुन सर्व महाविद्यालयांना भेट देत क्रीडा महोत्सवाची जनजागृती करण्यात आली.




समाजातील तरुणांनी जागरुक राहुन आरोग्यदायी, व्यसनमुक्त आणि राष्ट्र निर्मितीत सक्रीय योगदान द्यावे. तसेच नारीचा सन्मान व्हावा व राष्ट्राचा अभिमान वाढावा, स्त्री आत्मनिर्भर बनावी, देश प्रगतीपथावर जावा या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेतील प्रा.डॉ. वाघमारे, डॉ. शर्मा, डॉ. कोल्हे, प्रा. राजकुमार मोरे व बहुसंख्येने विद्यार्थी व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

# दयानंद कला महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भावपूर्ण अभिवादन



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दयानंद कला महाविद्यालयात भावपूर्ण अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी भूषविले.

महाविद्यालयात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी महाविद्यालयात आदरभावना व कृतज्ञतेचे वातावरण निर्माण झाले.



प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण विचारांचे महत्त्व विशद केले. "न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी दिलेले विचार आज अधिक महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्यांचे पालन करून जबाबदार नागरिक बनावे," असे आवाहन या वेळी त्यांनी केले.

महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी यांनी आपल्या मनोगतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणप्रेम, महिलांच्या हक्कांसाठी केलेले कार्य आणि सामाजिक परिवर्तनासाठी दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनाला योग्य दिशा द्यावी, असे विचार त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास, प्राथमिक शिक्षक प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेल्या श्रीमती शकुंतला चौदंते, श्रीमती सविता चरलेवाड, श्री. सखाहरी पापंटवार, श्री. बालाजी अंबुलगे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींनी भारावलेल्या वातावरणात हा अभिवादन कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात यशस्वीपणे संपन्न झाला.











# दयानंद कला महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम : 'एक कप चहासाठी—एकमेकांच्या भेटीसाठी'

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी आणि सचिव श्री. रमेश बियाणी यांच्या दूरदृष्टी संकल्पनेतून दयानंद कला महाविद्यालयात 'एक कप चहासाठी—एकमेकांच्या भेटीसाठी'हा अत्यंत स्तुत्य आणि महत्त्वपूर्ण उपक्रम मोठया उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका आणि कार्यालयीन कर्मचारी यांच्यामध्ये संवाद, समन्वय व स्नेह वृद्धिंगत करणे हा होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्णत्वास गेला. यात उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित आणि कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांनी विशेष पुढाकार घेतला. दिवसभराच्या व्यस्त शैक्षणिक कार्यातून थोडासा विरंगुळा देत, महाविद्यालयातील सर्व कर्मचारी एका अनौपचारिक वातावरणात एकत्रित आले.

चहाच्या वाफाळलेल्या कपांसोबत सर्वांनी एकमेकांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या, विचारांची देवाणघेवाण केली आणि कामकाजातील अनुभव मोकळेपणाने व्यक्त केले. तसेच, कार्यसंस्कृतीतील समन्वय सुधारण्यासाठीच्या सूचनांवरही सकारात्मक चर्चा झाली. या उपक्रमाने महाविद्यालयाच्या कार्यसंस्कृतीतील सहकार्याची भावना बळकट करण्यासाठी एक सकारात्मक आणि उत्साहाचे वातावरण निर्माण केले आहे.

याप्रसंगी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले, “दयानंद शिक्षण संस्थेच्या या अभिनव उपक्रमामुळे सर्व कर्मचाऱ्यांमधील शैक्षणिक सहसंबंध अधिक दृढ झाले आहेत. विचारांची ही देवाणघेवाण महाविद्यालयाच्या कामात सकारात्मक दृष्टिकोन आणण्यास निश्चितच मदत करेल.”

मैत्री, बांधिलकी आणि परस्पर संवाद वाढविण्यासाठी हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला आहे. प्राध्यापक व कर्मचारीवर्गाकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा उपक्रम पुढेही नियमितपणे राबविण्याचा मानस महाविद्यालयीन प्रशासनाने व्यक्त केला असून, दयानंद कला महाविद्यालयाचा हा उपक्रम शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांसाठी एक उत्कृष्ट आदर्श ठरणारा आहे.

# दयानंद कला मध्ये नवरंग स्नेह कार्यशाळेचे आयोजन



आजच्या संगणकीय युगात माणूस संवेदनशून्य होत चालला आहे. धावपळीचे जीवन जगताना तो स्वत:पासुन आणि इतरांपासून दूर होत चालला आहे. म्हणूनच आजच्या तरुणाला सद्भावना, बंधुता, समता आणि मानवी मूल्यांची शिकवण देणे गरजेचे झाले आहे. हा धागा पकडून युवक बिरादरी, मुंबई आणि दयानंद कला महाविद्यालय राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘नवरंग स्नेह उडान सांस्कृतिक कार्यशाळेचे’ आयोजन दि. 10 व 11 डिसेंबर रोजी सकाळी 9 ते 5 या वेळेत संपन्न होत आहे.





या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून सद्भावना, बंधुता,समता आणि मानवी मूल्यांची शिकवण दिली जात आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या शुभहस्ते झाले. या प्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, प्र.प्राचार्य डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ. वाजीद चाऊस, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, IQAC संचालक व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. संतोष पाटील, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि बहुसंख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



# दयानंद कला महाविद्यालयात अभिरुप युवा संसदेचे उत्साहात सादरीकरण

युवक बिरादरी मुंबई चे संस्थापक अध्यक्ष कर्ते करविते पद्मश्री मा.श्री. क्रांतीसिंहजी व दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांच्या प्रेरणेतुन अभिरुप युवा संसद दयानंद कला महाविद्यालयात संपन्न. जबाबदार नागरिक तयार व्हावेत त्यांना आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव होऊन यातून नि:पक्ष अभ्यासु राजकारणी निर्माण व्हावेत या उद्देशाने युवक बिरादरी मुंबई या संस्थेने अभिरुप युवा संसदेची संकल्पना समोर आणली याला प्रतिसाद म्हणून दयानंद कला महाविद्यालय गेली अनेक वर्ष अभिरुप युवा संसदेचे सादरीकरण करत आहे. देशहिताचे निर्णय घेऊन सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष देशातील नागरीकांचे कल्याण साधण्याचे प्रयत्न करतात देशहित आणि जनहिताच्या योजना सत्तापक्षाने संसदेत मांडल्यास विरोधीपक्षसुध्दा त्यांना भरभरुन साथ देत होते. मात्र अलिकडच्या काळात हे चित्र दुर्मीळ झाले आहे. म्हणूनच आजच्या युवकामध्ये नेतृत्त्वाचे गुण निर्माण व्हावेत संसदेत चालणाऱ्या कामकाजाची त्यांना जाणिव व्हावी आणि नेतृत्त्व उभे करुन त्यांनी देशहिताचे कार्य पार पाडावे. हा युवा संसद सादरीकरणामागचा मुख्य हेतु आहे.

दयानंद कला महाविद्यालय राज्यशास्त्र विभाग व युवक बिरादरी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभिरुप युवा संसद दयानंद महाविद्यालयात पार पडली. याप्रसंगी अभिरुप युवा संसदेचे समन्वयक प्रा. सचिनसर यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. IQAC संचालक डॉ. संतोष पाटील, प्रा. राजकुमार मोरे, प्रा. विलास कोमटवाड, बालाजी सुळ युवा संसदेतील सभापती व त्यांचे शिष्टमंडळ यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



# मासिक ई-मॅगझीन

## महिना : डिसेंबर २०२५

**संपर्क**
**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**
**ईमेल : daclatur@rediffmail.com वेबसाईट : www.daclatur.org**

**आभार**
**या ई-मॅगझीनच्या निर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक,**
**विद्यार्थी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार.**